MHAU080017732025

**महिलांचे कौटुंबिक हिसांचारापासून सरंक्षण कायद्याखालील**

**अर्ज क्र. २८/२०२५ मधील निशाणी क्र. ०४ वरील आदेश**

अर्जदारांनी प्रस्तुतच्या अर्जामध्ये महिलांचे कौटुंबिक हिसांचारापासून संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यासाठी तसेच गैरअर्जदार याने अर्जदार यांना राहत असलेल्या घरामध्ये राहण्यास मज्जाव करु नये तसेच सदरचे घर कोणस तब्दील करु नये करिता अंतरीम आदेश मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदारांचे म्हणणे असे की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचे लग्न दि. ०२/०५/२०१२ रोजी मौजे आसई, ता. जाफराबाद, जि. जालना येथे थाटामाटात संपन्न झाले. अर्जदार हिच्या आई–वडीलांनी सदर विवाहामध्ये अर्जदारास संसारउपयोगी साहित्य, सोन्या चांदीचे दागिने आणि गैरअर्जदार यास पाच ग्राम सोन्याची अंगठी, कपडे घेण्यासाठी नगदी रु. ३०,०००/– आणि रु. १ लाख वरदक्षिणा देऊन लग्न लाऊन दिलेले आहे. सदर लग्नसंबंधातुन अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांना अर्जदार क्र. २ व ३ ही अपत्ये झालेली आहेत.

**०३.** विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदण्यास गेली. गैरअर्जदार हा सिल्लोड येथे महावितरणमध्ये नोकरीस असल्यामुळे ते सिल्लोड येथे संसार करु लागले. गैरअर्जदार हा सिल्लोड येथे नोकरीस असल्यामुळे त्याने सिल्लोड येथील सर्वे क्र. १२ मध्ये विकत घेतलेल्या प्लॅाटवर आरसीसी बांधकाम करुन घराचे बांधकाम केले. सदर घरामध्ये अर्जदार व गैरअर्जदार संसार करत आलेले आहेत.

**०४.** गैरअर्जदार याचे सविता संजय बोराडे, रा. मंगरुळ, ता. सिल्लोड या

महिलेसोबत अनैतिक संबंध असल्याने तो अर्जदार हीस दारु पिऊन मारहाण करणे, रात्री–बेरात्री घराबाहेर काढणे इ. प्रकारे त्रास देऊ लागला. करिता सदर बाब अर्जदार हिने तिचे नातेवाईकांना कळविली. मात्र तरी देखील गैरअर्जदार याचे वागण्यात कोणताही फरक पडला नाही. गैरअर्जदार हा मंगरुळ येथे वायरमन म्हणुन कार्यरत असल्यामुळे तो अर्जदार हीस मंगरुळ येथे फ्यूज खराब झाले, मला लवकर जावे लागेल असे म्हणुन सकाळी लवकर जात होता. गैरअर्जदार मंगरुळ येथुन कधी घरी यायचा तर कधी कधी मुक्काम करायचा. सदरचा प्रकार दोन वर्षापर्यंत सुरु होता. त्यामुळे अर्जदार हीस संशय आला. म्हणुन तिने गैरअर्जदाराचा मोबाईल बघितला असता तिचे लक्षात आले की, गैरअर्जदार हा सविता संजय बोराडे या महिलेशी फोनवर सतत बोलतो. तिने सदर बाब तिचे आई–वडील, सासु आणि दीर यांना सांगितली. त्या लोकांनी देखील त्यास समजविण्याचा प्रयत्न केला परंतु गैरअर्जदार याने कोणाचे ऐकले नाही.

**०५.** दि. ०१/०७/२०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता गैरअर्जदार दारु पिऊन घरी आला. अर्जदार हिने गैरअर्जदारास तो दोन दिवस कोठे होता याबाबत विचारणा केली असता तो तिस शिवीगाळ करुन चापटाबुक्यांनी मारहाण करुन म्हणाला की, मी कोठे राहतो, काय करतो याबाबत मला विचारायचे नाही. माझे सविता संजय बोराडे हिचेसोबत संबंध असुन ती सुध्दा सिल्लोड येथे राहण्यास आलेली आहे आणि मी तिचेकडे राहतो, तुला काय करायचे ते कर. तसेच त्याने अर्जदार हीस धमकी दिली की, तु माझे घरामध्ये राहायचे नाही आणि जर माझे नादी लागली तर तुला जिवंत सोडणार नाही. करिता अर्जदार हिने सिल्लोड शहर पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा नोंद क्र. १५४/२०२५ नोंदविला.

**०६.** गुन्हा दाखल झाल्यानंतर गैरअर्जदार हा अर्जदार राहत असलेल्या सर्वे क्र. १२ मधील प्लॉट क्र. १९ वरील घरी आला व त्याने अर्जदार हीस शिवीगाळ करुन तुला घराबाहेर हाकलुन देतो व येथे मी सविता संजय बोराडे हिला घेऊन राहतो, तुला या

घरामध्ये कधीही राहु देणार नाही अशी धमकी दिली. भितीमुळे अर्जदार हिने तिचे आई–वडीलांना बोलावले व सदर बाब त्यांना सांगितली. मात्र गैरअर्जदाराने अर्जदाराचे आई–वडीलांचे देखील ऐकले नाही. गैरअर्जदार हा अर्जदार हिस मुलींसह केव्हाही घरातुन बेदखल करु शकतो. करिता त्यास पायबंद घालणे आवश्यक आहे.

०७. गैरअर्जदार सविता संजय बोराडे हिचेसोबत राहत असुन तो अर्जदार यांची कोणत्याही प्रकारे काळजी घेत नाही. गैरअर्जदाराने अर्जदार यांचे पालनपोषण उदरनिर्वाहासाठी कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्याने अर्जदार क्र. २ व ३ यांचे शिक्षणासाठी देखील कोणतीही व्यवस्था केलेली नाही व तो खर्च देखील करत नाही. त्यामुळे अर्जदार यांचेवर उपासमारीची वेळ आलेली आहे. करिता प्रस्तुत प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अर्जदार यांना अंतरिम पोटगी म्हणुन रु. ३०,०००/– मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

०८. अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार महावितरणमध्ये वायरमन म्हणुन नोकरीस आहे. त्यास प्रतिमहिना रु. ४० ते ५० हजार पगार मिळतो. तो अर्जदार यांना प्रतिमहिना रु. ३०,०००/– अंतरिम पोटगी देऊ शकतो. करिता अर्ज दाखल तारखेपासुन प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार याचेकडुन अर्जदारांना प्रतिमहिना रु. ३०,०००/– अंतरिम पोटगी देववावी.

०९. तसेच गैरअर्जदार याने अर्जदार राहत असलेल्या सर्वे क्र. १२ मधील प्लॉट क्र. १९ वरील म्हसोबा नगर, सिल्लोड स्थित घर ज्यास चतुःसीमा पूर्वेस २० फुटाचा रोड, पश्चिमेस प्लॉट क्र. २४, दक्षिणेस प्लॉट क्र. २० आणि उत्तरेस १५ फुटाचा रस्ता या घरामध्ये येऊन अर्जदार यांना त्रास देऊ नये तसेच सदर घरातुन त्यांना बेदखल करु नये आणि सदर घर कोणासही परस्पर विक्री करु नये करिता पायबंद घालणेबाबत अंतरिम आदेश करावा अशी विनंती करण्यात आलेली आहे.

**१०.** गैरअर्जदार याने नि.क्र. १४ वर मुख्य अर्जास लेखी म्हणणे सादर केलेले आहे. तसेच नि.क्र. १५ वर पुरसीस देऊन नि.क्र. १४ वरील लेखी खुलासा नि.क्र. ०४ साठी देखील विचारात घेण्यात यावा असे कथन केलेले आहे.

**११.** गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ व त्याचा विवाह दि. ०२/०५/२०१२ रोजी मोठ्या थाटामाटामध्ये मौजे आसई, ता. जाफराबाद, जि. जालना येथे झाला हा मजकुर मान्य केला आहे. तसेच गैरअर्जदार याने लग्न झाल्यानंतर अर्जदार ही त्याचेकडे राहण्यास आली व ते चांगला संसार करु लागले. तो सिल्लोड येथे महावितरणमध्ये नोकरीस असल्यामुळे त्याने मौजे सिल्लोड येथे सर्वे क्र. १२ मध्ये स्वतःचे आरसीसी घर घेतलेले आहे. त्या घराची सौदा पावती अगोदर अर्जदार हिचे नावे केली होती मात्र घराचे खरेदीखत गैरअर्जदार याचे नावे केले आहे. आजरोजी अर्जदार आणि गैरअर्जदार हे एकाच घरामध्ये राहत असुन गैरअर्जदार याचे नामे सविता संजय बोराडे, रांमंगरुळ, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर या बाईसोबत अनैतिक संबंध असल्यामुळे गैरअर्जदार हा दारु पिऊन अर्जदार हिस रात्री बेरात्री घराबाहेर काढुन मारहाण करतो. सदरील बाब अर्जदार हिने तिच्या व त्याच्या नातेवाईकांना सांगितली असता तरी देखील गैरअर्जदार याचे वागणुकीत काही फरक पडला नाही. वरील सर्व मजकुर अंशतः खरा व बरोबर असल्याचे कथन केले आहे.

**१२.** अतिरीक्त जबाबामध्ये गैरअर्जदार याने असे नमुद केले आहे की, तो सन २०२४ मध्ये मंगरुळ या ठिकाणी वायरमन म्हणुन नोकरीस असतांना संजय बोराडे, रा. मंगरुळ यांचे शेत बागायती असल्याने त्यांचे विहरीवरील पाण्याची इलेक्ट्रीक मोटारमध्ये बिघाड झाल्यामुळे व विहरीवरील लाईट दुरुस्तीकामी काही वेळेस जात होता. त्यामुळे त्याची संजय बोराडेसोबत ओळख होऊन एकमेकांचे मोबाईलवर बोलणे होत होते. संजय बोराडे यांची पत्नी सविता बोराडे हिने तिचे पतीचे मोबाईलमधुन गैरअर्जदार यांचा नंबर घेऊन लाईटच्या कामानिमीत्त काहीवेळा गैरअर्जदार याचेसोबत बोलत असे. त्यानंतर

सविता संजय बोराडे हिने फोन करुन गैरअर्जदाराकडे पैश्याची मागणी केली. सदर माहिती गैरअर्जदार याने अर्जदार हिस दिली. अर्जदार, गैरअर्जदार आणि घरातील नातेवाईकांनी एकत्र बसुन गैरअर्जदार याचे नोकरीस बाधा येऊ नये व प्रतिष्ठा कमी होऊ नये म्हणुन सदर महिलेसोबत रु. १००/– चे मुद्रांक पेपरवर करार करुन सदर महिलेपासुन होणारा शारीरीक, मानसिक त्रास मिटवुन त्या महिलेसोबत झालेली तोंड ओळख संपुष्टात आणली आहे.

**१३.** गैरअर्जदार यास नोकरीपासुन मिळणाऱ्या वेतनाव्यतिरीक्त इतर कोणतीही संपत्ती नाही. त्यास नोकरीपासुन दरमहा रु. ६५,०००/– मिळते. गैरअर्जदार याने भारतीय स्टेट बँक, सिल्लोड येथुन २०१८ मध्ये वैयक्तीक कर्ज घेतले असल्याने त्याचा हफ्ता रक्कम रु. १०,१५०/–, भविष्य निर्वाह निधी हफ्ता रक्कम रु. ७,०००/–, एल.आय.सी. हफ्ता रक्कम रु. ३,०००/–, मैउकी पॉलीसी रक्कम रु. १,५००/– आणि रु. २३,५००/– सोसायटी असे एकुण रक्कम रु. ४५,१५०/– कपात होऊन उर्वरीत रक्कम रु. १९,८५०/– शिल्लक राहुन त्यातच त्यास उदरनिर्वाह करावा लागतो. गैरअर्जदार यांना वरील मिळणाऱ्या पगाराव्यरितीक्त त्याचे नावे कोणत्याही ठिकाणी जमीन अथवा मालमत्ता नसुन दसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जाच्या प्रार्थनेतील संपूर्ण मजकुर काल्पनीक व खोट्या स्वरुपाचा असल्याचे कथन करुन शेवटी अर्जदारांनी गैरअर्जदाराविरुध्द दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**१४.** अर्जाचे अवलोकन केले. अर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री. जी. व्ही. ढोणे यांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदार आणि त्यांचे विधीज्ञ श्री. ए. एस. निकाळजे यांचा वारंवार पुकारा केला असता ते उपस्थित राहिले नाही. करिता गैरअर्जदार यांचे युक्तीवादाविना प्रस्तुत अर्ज निर्णयासाठी ठेवण्यात आला. खालील मुद्दे निष्कर्षाकरीता समोर आले. त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदविण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होय, अर्जदार क्र. १ हिस प्रतिमहा रक्कम रु. १०,००/– आणि अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु. ५,०००/– |
| २. | अर्जदार क्र. १ ही मागणी केल्याप्रमाणे सिल्लोड येथील सर्वे क्र. १२ मधील प्लॉट क्र. १९ वरील राहते घरातुन तीस मुलांसह बेदखल करु नये आणि सदर घर गैरअर्जदार याने कोणास परस्पर विक्री करु नये याबाबत अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | होय.. |
| २. | अंतिम आदेश | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ व २ करीताः–

**१५.** महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायद्याचे कलम २३ प्रमाणेचा अर्ज निकाली काढत असताना तिच्यासोबत कौटुंबिक हिसांचार झाल्याचे कथन प्रथमदर्शनी घेणे आवश्यक आहे. गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ सोबत त्याचे झालेले लग्न आणि सदर लग्नसंबंधातुन अर्जदार क्र. २ व ३ यांचा जन्म झाल्याबाबत तसेच अर्जदार क्र. १ आणि त्याचेतील वैवाहिक संबंध आजरोजी अस्तित्वात असल्याबाबत मान्य केलेले आहे.

**१६.** एवढेच नव्हे तर गैरअर्जदार क्र. २ याने त्याचे नि.क्र. १४ वरील कैफीयत

खुलाश्यामध्ये अर्जदार हिचे मुख्य अर्जाचे परिच्छेद क्र. २ मधील कथन अंशतः मान्य केलेले आहे. सदर मजकुर असा आहे की, लग्न झाल्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदण्यास गेली व ते चांगला संसार करु लागले. गैरअर्जदार हा सिल्लोड येथे महावितरण मध्ये नोकरीस असल्यामुळे सिल्लोड येथे राहण्यास आले आणि सुखी संसार करु लागले. गैरअर्जदार हा सिल्लोड येथे कायम नोकरीस असल्यामुळे त्याने मौजे सिल्लोड येथे सर्वे क्र. १२ मध्ये स्वतःचे आरसीसी घर घेतलेले आहे. सदर घराची सौदेपावती गैरअर्जदार याने अगोदर अर्जदार हिचे नावावर केली होती. त्यानंतर त्याने सदर घराचे खरेदीखत स्वतःच्या नावे केलेले आहे. आजरोजी अर्जदार व गैरअर्जदार एकाच घरामध्ये राहत असुन गैरअर्जदार याचे नामे सविता संजय बोराडे, रा. मंगरुळ, ता. सिल्लोड या बाईसोबत अनैतिक संबंध असल्यामुळे गैरअर्जदार हा दारु पिऊन अर्जदार हीस नेहमी रात्री–बेरात्री घराबाहेर काढुन मारहाण करतो. सदरील बाब अर्जदार हिने तिच्या व त्याच्या नातेवाईकाला सांगितली तरी देखील गैरअर्जदार याचे वागणुकीत काही फरक पडला नाही.

**१७.** ज्या अर्थी गैरअर्जदार याने अर्जदार क्र. २ हिचे मुख्य अर्जातील परिच्छेद क्र. २ मधील मजकुर मान्य केलेला आहे आणि त्याने नि.क्र. १५ वर पुरसीस देऊन नि.क्र. १४ वरील कैफीयत अर्जदार हिचे नि.क्र. ०४ वरील प्रस्तुत अर्जास खुलासा म्हणुन वाचण्यात यावे असे न्यायालयास कळविले आहे. याचाच अर्थ असा की, गैरअर्जदार याचा नि.क्र. १४ वरील खुलासा हा प्रस्तुत अर्जाचा खुलासा देखील आहे.

**१८.** एवढेच नव्हे तर, अर्जदार हिने गैरअर्जदार आणि सविता संजय बोराडे नामक महिलेच्या अनैतिक संबंधाविषयी आरोप केलेले असतांना त्याविषयी गैरअर्जदार याने त्याचे कैफीयतमध्ये देखील असे नमुद केले आहे की, तो मंगरुळ येथे वायरमन म्हणुन कार्यरत असतांना संजय बोराडे नामक व्यक्तीशी त्यांचे शेतातील इलेक्ट्रीक मोटर आणि लाईट दुरुस्ती संदर्भाने त्याची ओळख संजय बोराडे इसमासोबत झाली आणि

ओळखीमुळे त्यांचे एकमेकांसोबत फोनवर बोलणे होत होते. तेव्हा संजय बोराडे यांची पत्नी सविता हिने पतीचे मोबाईलमधुन गैरअर्जदार क्र. १ याचा नंबर घेऊन ती महिला लाईटचे कामानिमीत्ताने त्याचेसोबत बोलत होती. काही वेळानंतर तिने गैरअर्जदाराकडे मोबाईलवर संपर्क करुन पैश्यांची मागणी केली. ही माहिती गैरअर्जदार याने अर्जदार हीस दिली. त्यामुळे अर्जदार, गैरअर्जदार व त्यांचे घरातील नातेवाईकांनी एकत्र बसुन गैरअर्जदार याचे नोकरीस बाधा येऊ नये म्हणुन सदर महिलेसोबत रु. १००/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करुन त्या महिलेपासुन होणारा शारीरीक मानसिक त्रास व झालेली तोंडओळख संपुष्टात आणली.

**१९.** अर्जदार हिने गैरअर्जदार व सविता संजय बोराडे नामक महिलेच्या अनैतिक संबंधाविषयी केलेले आरोप प्रथमदर्शनी प्रस्थापित करण्यासाठी गैरअर्जदार याने सदर महिलेस करुन दिलेल्या सुलाहनामा / तडजोडपत्रावर भिस्त ठेवुन सदर दस्त प्रकरणात दाखल केलेला आहे. सदर दस्तामधील मजकुराचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दस्त लिहुन देणार म्हणुन बोराडे सविता संजय ही महिला आहे आणि दस्त लिहुन घेणार म्हणुन गैरअर्जदार गणेश साहेबराव आढावे हा आहे. सुलाहनाम्यातील मजकुर असा आहे की, लिहुन देणार व लिहुन घेणार हे सिल्लोड शहरातील एकाच एरीयामध्ये राहत असल्याकारणाने त्यांची तोंडओळख होऊन त्यांची एकमेकांमध्ये जवळीक निर्माण झाली. त्यातुन मैत्रीचे संबंध निर्माण होऊन लिहुन देणार व लिहुन घेणार यांच्यामध्ये काही दिवस रिलेशनशीपमध्ये होते. त्यामधुन दोघांमध्ये मतभेद होऊन शाब्दीक वाद झाले. त्यामुळे लिहुन देणार हिने दि. ०८/०८/२०२५ रोजी लिहुन घेणार याचेविरुध्द शहर पोलीस स्टेशन, सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर येथे तक्रार केली होती. त्याच दिवशी दि. ०८/०८/२०२५ रोजी लिहुन देणार व लिहुन घेणार व इतर प्रतिष्ठीत व्यक्ती हे एकत्र बसुन लिहुन देणार व लिहुन घेणार यांचेमध्ये तडजोड झाली. सदर तडजोडीचे अंती लिहुन देणार ही लिहुन घेणार यांना यानंतर कोठेही भेटणार नाही, तसेच मोबाईलद्वारे फोन देखील करणार नाही तसेच लिहुन देणार ही लिहुन घेणार

याचेविरोधात कोणत्याही दिवाणी अथवा फौजदारी न्यायालयात तक्रार दाखल करणार नाही तसेच कोणत्याही पोलीस स्टेशनलध्ये लिहुन घेणार याचेविरुध्द तक्रार दाखल करणार नाही.

**२०.** सदर सुलाहनाम्याच्या परिच्छेद क्र. २ मध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, सदर तडजोड/सुलाहनाम्याअंती असे ठरले आहे की, वरील ठरल्याप्रमाणे लिहुन देणार ही लिहुन घेणार यांना कोणत्याही प्रकारे त्रास देणार नाही. या अटीवर लिहुन देणार हिस रक्कम रु. ३,००,०००/– (अक्षरी रु. तीन लाख मात्र) चा भारतीय स्टेट बँक, शाखा सिल्लोड चा धनादेश क्र. ९३५४८९, दि. २८/०८/२०२५ दिला असुन याबाबत कोणत्याही प्रकारे तक्रार राहिलेली नाही. लिहुन घेणार व लिहुन देणार यांची आपसामध्ये तडजोड झाली असल्यामुळे लिहुन देणार हिने सिल्लोड शहर पोलीस स्टेशन येथे दाखल केलेली तक्रार देखील लिहुन घेणार ही सदर तक्रार विनाअट काढुन घेणार आहे.

**२१.** एकंदरीत गैरअर्जदार याने सविता संजय बोराडे नामक व्यक्तीसोबत दि. ०८/०८/२०२५ रोजी रु. १००/– चे मुद्रांक पेपरवर केलेला सुलाहनामा / तडजोडपत्र यावरुन हे प्रथमदर्शनी दिसुन येते की, गैरअर्जदार याचे सदर महिलेसोबत अनैतिक संबंध होते आणि त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार करत होता. अर्जदार हिने दि. १८/०९/२०२५ रोजी सविता संजय बोराडे या महिलेविरोधात सिल्लोड शहर पोलीस स्टेशनला अदखलपात्र अपराध क्र. २१०/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ३५२, ३५१(२) नुसार गुन्हा दाखल केलेला आहे. त्यातील कथन असे आहे की, अर्जदार वैशाली गणेश आढावे हिचे पती गणेश आढावे म्हणजेच गैरअर्जदार हे अजिंठा येथे एमएसइबी मध्ये नोकरी करत असुन त्यांचे सविता संजय बोराडे, रा. समता नगर, सिल्लोड हिचेसोबत प्रेमसंबंध आहेत. दि. १७/०९/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता फिर्यादी आणि तिचे वडील संजय दाभाडे

असे सविता संजय बोराडे हीस समजावुन सांगण्यास गेले की, तु माझ्या पतीसोबत प्रेमसंबंध ठेवु नको, माझ्या पतीला सोडुन दे तेव्हा ती म्हणाली की, मी तुझ्या पतीला सोडणार नाही असे बोलुन तिने मला व माझ्या वडीलांना शिवीगाळ करुन म्हणाली की, तुझा संसार मी होऊ देणार नाही, तुला पाहुन घेईल अशी धमकी दिली. एकंदरीत गैरअर्जदार आणि सविता संजय बोराडे हिचेमध्ये अनैतिक संबंध असल्याचे दिसुन येते.

**२२.** अर्जदार हिने गैरअर्जदार आणि सविता बोराडे नामक महिलेसोबत असलेले छायाचित्र देखील अभिलेखावर दाखल केलेले आहे. त्यावरुन देखील हे दिसुन येते की, गैरअर्जदार याचे सदर महिलेसोबत अनैतिक संबंध आहेत. अर्जदार हिने दि. २२/०९/२०२५ रोजी सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सिल्लोड विभाग, ता. सिल्लोड यांना अर्ज देऊन गणेश साहेबराव आढावे (सिनीयर टेक्नीशीयन वायरमन), सध्या कार्यरत – अजिंठा यांच्या पगाराची अर्धी रक्कम तीस मिळणेसाठी आणि त्याचे नॉमीनीमध्ये कुठल्याही प्रकारे बदल न करण्याबाबत अर्ज दिलेला आहे. सदर अर्ज अभिलेखावर ठेवण्यात आलेला आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता गैरअर्जदार याने त्याचे असलेल्या अनैतिक संबंधामुळे अर्जदार हीस शिवीगाळ करुन मारहाण करणे, घरामध्ये कुठल्याही प्रकारचे सामान न आणणे, मुलांची शाळेची फी न भरणे इ. प्रकारे कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसुन येत आहे. तसेच अर्जदार हीला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याने आणि गैरअर्जदार त्यांचे पालनपोषणाची तजबीज करत नसल्याने कुंठीत जीवन जगावे लागत आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते. गैरअर्जदार हा विद्युत वितरण कंपनीमध्ये वायरमन या पदावर कार्यरत आहे. त्याच्याच कथनाप्रमाणे त्यास दरमहा रु. ६५,०००/– एवढे वेतन मिळते. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदारांना त्यांचे पालनपोषणासाठी अंतरिम पोटगी देण्यास बांधील आहे.

**२३.** गैरअर्जदार याने त्याचे खुलाश्यामध्ये असे कथन केले आहे की, त्यास

एकुण रु. ६५,०००/– एवढे वेतन आहे. मात्र त्याचे वेतनातुन रु. २३,५००/– सोसायटी, रु. १०,१५०/– त्याने स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा सिल्लोड येथुन घेतलेल्या कर्जाचा हफ्ता, रु. ७,०००/– भविष्य निर्वान निधीचा हफ्ता, रु. ३,०००/– एलआयसी हफ्ता, रु. १५००/– मेडीक्लेम पॉलीसीचा हफ्ता असे एकुण रु. ४५,१५०/– कपात होत असुन त्यास केवळ रु. १९,८५०/– एवढी रक्कम उदरनिर्वाहाकरिता मिळते. परंतु गैरअर्जदार याने नमुद केलेल्या कपातीविषयी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर ठेवला नाही.

**२४.** अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार याची पत्नी म्हणुन आणि अर्जदार क्र. २ व ३ हे त्याचे अपत्य म्हणुन तो ज्या दर्जाचे जीवन जगत आहे त्या दर्जाचे जीवन जगण्याचा त्यांना कायदेशीर अधिकार आहे. तसेच गैरअर्जदाराने देखील तो स्वतः ज्या दर्जाने जीवन जगत आहे त्या दर्जाचे जीवन जगण्यासाठी अर्जदारांचे सर्वतोपरी व्यवस्था करणे हे त्याचे कायदेशीर आणि नैतिक कर्तव्य आहे. अर्जदार हीस उत्पन्नाचे साधन असल्याबाबत आणि ती स्वतःचा आणि अपत्यांचा उदरनिर्वाह भागवण्यास हे दर्शविण्यासाठी कोणताही पुरावा गैरअर्जदार याने अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ आणि अर्जदार क्र. २ व ३ यांचे अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय उपचार आणि शैक्षणिक खर्च लक्षात घेता गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हीस प्रतिमहिना रु. १०,०००/– आणि अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी प्रतिमहिना रु. ५,०००/– अंतरिम पोटगी मंजुर करणे उचित होईल. सदरची रक्कम अर्जदार यांना त्यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासुन मिळण्यास ते पात्र असतील.

**२५.** यापूर्वी केलेल्या चर्चेप्रमाणे गैरअर्जदार आणि नमुद महिला यांचेत अनैतिक संबंध असल्याचे प्रथमदर्शनी अभिलेखावर आलेले आहे. तसेच गैरअर्जदार हा अर्जदार हीस घराबाहेर काढुन देऊन हिंसाचार करत असलेबाबत देखील अभिलेखावर आलेले आहे. तसेच गैरअर्जदाराने अर्जदार हीस गैरअर्जदार याने बांधलेल्या घरातुन बेदखल

करण्याबाबत धमक्या देखील दिलेल्या आहेत. त्यामुळे जर गैरअर्जदाराने अर्जदार ही राहत असलेल्या घरामध्ये गहान खत, विक्री खत या सारखा व्यवहार केल्यास अर्जदार हीला निवाऱ्यासाठी व्यवस्था शिल्लक राहणार नाही. त्यामुळे गैरअर्जदार याने सिल्लोड येथील सर्वे क्र. १२ मधील प्लॉट क्र. १९ वरील बांधलेल्या घरामध्ये कोणत्याही प्रकारचा व्यवहार करुन त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण करु नये करिता प्रस्तुत अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम मनाईहुकुम देणे उचित होईल. वरील सर्व विचाराअंती मी मुद्दा क्र. १ व २ ला होकारार्थी उत्तर नोंदवित आहे व मुद्दा क्र. ३ ला उत्तर म्हणून खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार क्र. १ ला दरमहा रक्कम रुपये १०,०००/– आणि अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रु. ५,०००/– इतकी रक्कम प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि. ०५/०७/२०२५ पासुन पुढील आदेश होईपर्यंत नियमितपणे दर महिन्याच्या ५ तारखेच्या आत द्यावी.

३. गैरअर्जदाराने अर्जदारांना सिल्लोड येथील सर्वे क्र. १२ मधील प्लॉट क्र. १९ वरील राहते घरातुन बेदखल करु नये आणि सदर घराचे मालकीहक्कामध्ये कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीचा हक्क निर्माण करु नये असा अंतरिम आदेश याद्वारे पारीत करण्यात येत आहे.

Digitally signed by KAILAS TRYAMBAK ADHAYKE
Date: 2025.10.10 15:16:24 +0530

(कैलास त्र्यं. अढायके)

दि. ०९/१०/२०२५ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, सिल्लोड.